# <u>सरदार पटेल जयंती (राष्ट्रीय एकता दिवस)</u>




राजनीतिक आणि कुटनीतिक क्षमतेचा परिचय देतेवेळी स्वतंत्र भारताला एकजूट करण्याचे असाधारण कार्य खूपच कुशलतेने संपन्न करण्यासाठी ओळखले जाणारे **लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल** यांची जयंती **३१ ऑक्टोबर** रोजी **'राष्ट्रीय एकता दिवस'** म्हणून साजरी करण्यात येते. या प्रसंगी, भारतीय विद्या भवन्स सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवार दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी सकाळी ११ वाजता संस्थेचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोहन मुरडी सर, प्रभारी प्रबंधक श्री. संजय विणेरकर सर, टेक्यूप-३ चे को-ऑर्डिनेटर डॉ. राहुल दहातोंडे सर, तसेच संस्थेतील इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत कोविड-१९ विषाणूच्या शासनाच्या दिशा-निर्देशांचे पालन करून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोहन मुरडी सर यांच्या हस्ते महाविद्यालायातील सरदार पटेल यांच्या अर्धाकृति मुर्तीला पुष्पहार चढवून पूजा करण्यात आली. तसेच प्रभारी प्राचार्यांनी सरदार पटेल यांच्या जीवनाबद्दल तसेच त्यांनी केलेल्या कार्याबद्दल उपस्थित कर्मचाऱ्यांना संबोधित केले.



तदनंतर सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांनी **'राष्ट्रीय एकता दिवस'** निमित्त शपथ पठण केली. सर्वांनी अशी शपथ घेतली की मी, राष्ट्राची एकता, अखंडता आणि सुरक्षितता राखण्यासाठी स्वतःला समर्पित करेन. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांनी पुष्प अर्पण करून सरदार पटेल यांना अभिवादन केले.

धन्यवाद.

